पीपल्स वेलफेअर सोसायटी, नागपूर द्वारा संचालित


# इंदिरा गांधी कला-वाणिज्य महाविद्यालय

कळमेश्वर, जि. नागपूर

website : www.igacck.org
e-mail : igckcollege@gmail.com
Ph.: 07118 - 271393

**NAAC ACCREDITED**

# माहितीपत्रक
## २०२३-२४



## पीपल्स वेलफेअर सोसायटी, नागपूर

(Regd. No. 131/67 NGP)

### कार्यकारिणी



डॉ. मधुकरराव वासनिक
अध्यक्ष



डॉ. एन. एन. रामराजे
उपाध्यक्ष



ॲड. मोहन वासनिक
सचिव



श्री. मनोज वासनिक
सहसचिव



डॉ. विमल वासनिक
सदस्य



ॲड. भारत वासनिक
सदस्य



श्री. डी. के. बनसोड
सदस्य



श्री. मनीष लांजेवार
सदस्य



श्री. आकाश मदनानी
सदस्य



श्रीमती निशा वासनिक
सदस्य



श्रीमती परीजा वासनिक
सदस्य

# आमचे आदर्श



## डॉ. मधुकरराव वासनिक

**अध्यक्ष**

## विद्यार्थ्यांना संदेश

माझ्या प्रिय विद्यार्थ्यांनो, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी यासाठी पीपल्स वेलफेअर सोसायटीच्या माध्यमातून कळमेश्वर तालुक्यात इंदिरा गांधी कला, वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. या महाविद्यालयात दरवर्षी हजारो विद्यार्थी पदवीधर होऊन विविध क्षेत्रात कार्यरत होत आहेत. आता शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करण्यासाठी संस्थेच्या विद्यमाने विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

विद्यार्थ्यांकरिता भव्यदिव्य ग्रंथालय, अत्याधुनिक जीम व गर्ल्स कॉमन रूमची सोय केलेली आहे. क्रीडा-सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे त्यांच्या गुणांना प्रोत्साहित करण्यासाठी क्रीडा महोत्सव व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या कौशल्याचा विकास करणे. तसेच स्पर्धा परीक्षेबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून रोजगारक्षम करण्याचा प्रयास सुरू करण्यात आलेला आहे.

या सर्व सोयींचा लाभ केवळ आपल्याच महाविद्यालयात मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा आणि मिळालेल्या संधीचे सोने करून आपला भविष्यकाळ उज्ज्वल करावा. कारण आयुष्यात संधी चालून येणे हीच मोठी गोष्ट असते. अशी संधी आयुष्याचा सुवर्णकाळ घडविण्यासाठी महत्त्वाची ठरते. तुमच्या आयुष्याची नवी पहाट इथूनच उगवेल. आम्ही तुम्हाला संधी उपलब्ध करून देत आहोत. तुमच्या पंखांना बळ देत आहोत. आता उंच आकाशात भरारी घ्यायला सज्ज व्हा. तुमच्या यशस्वी आयुष्याला लाख लाख सदिच्छा!

**डॉ. मधुकरराव वासनिक**

*MBBS, DCH, MA, LLM (I), EX–MLC*

चेअरमन - पीपल्स वेलफेअर सोसायटी



**प्राचार्य डॉ. अजय कृ. चिकाटे**

# प्राचार्यांचे मनोगत

विद्यार्थी आणि समाज यांच्या अभ्युदयासाठी पीपल्स वेलफेअर सोसायटी द्वारा संचालित इंदिरा गांधी कला-वाणिज्य महाविद्यालयाची कळमेश्वर येथे निर्मिती झाली. विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेकानेक पैलू पाडण्याचे कार्य महाविद्यालयात अविरत सुरू असते. कोणतीही महाविद्यालये एक प्रकारच्या प्रयोगशाळाच असतात. विद्यार्थी आणि समाज यांच्या प्रगतीसाठी वेगवेगळे प्रयोग महाविद्यालयात केले जातात. विशेषत: ग्रामीण विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे मुख्य उद्दीष्ट नजरेपुढे ठेऊन या महाविद्यालयाची वाटचाल सुरू आहे.

समकालीन आधुनिक युगात आजच्या विद्यार्थ्यांना ज्या कौशल्याची गरज आहे त्या सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी हे महाविद्यालय सक्षम आहे. सोबतच नैतिकमूल्यांचेही संस्कार विविध उपक्रमातून येथे केले जातात. विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडविणे हे या महाविद्यालयाचे स्वप्न आहे. जीवनात येणाऱ्या संकटांना धैर्याने सामोरे जाऊन आयुष्याची वाटचाल सुखद होण्यासाठी विद्यार्थ्यांचे या महाविद्यालयात विशेष समुपदेशन केले जाते.

या महाविद्यालयातून शिक्षण घेतांना प्रत्येक विद्यार्थ्यांने समाजाकरिता व देशहिताकरिता कार्यतत्पर असावे हाच आमचा निरंतर प्रयत्न आहे. पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांनी या महाविद्यालयातील विविध संधींचा लाभ घेऊन यशस्वी व्हावे, जीवनसन्मुख व्हावे. त्यांच्या भावी यशस्वी वाटचालीस मन:पुर्वक शुभेच्छा!

❀ ❀ ❀

# PEOPLE'S WELFARE SOCIETY

*(Regd. No. 131/67 NGP*
**Office :** *Dr. Madhukarrao Wasnik P.W.S. College*
*Kamptee Road, Nagpur - 26*

## ★ GOVERNING BODY ★

| | | |
|---|---|---|
| 1. | **Dr. Madhukarrao Wasnik** *(MBBS, DCH, MA, LLB, LLM(l), Ex. MLC)* | **Chairman** |
| 2. | **Dr. N.N. Ramraje** *(MD, Retd. Prof. Grant Medical College, Mumbai)* | **Vice-Chairman** |
| 3. | **Adv. Mohan Wasnik** *(B.Com., LLB)* | **Gen. Secretary** |
| 4. | **Shri. Manoj Wasnik** *(M.A.)* | **Jt. Secretary** |
| 5. | **Smt. Dr. Vimal M. Wasnik** *(M.B.B.S.)* | **Member** |
| 6. | **Adv. Bharat S. Wasnik** *(B.Sc., LLB (RetdJudge Sr. Div.))* | **Member** |
| 7. | **Shri. D.K. Bansod** *(M.A.)* | **Member** |
| 8. | **Shri. Manish Lanjewar** *(B.E. Civil)* | **Member** |
| 9. | **Akash Madnani** *(M.B.A.)* | **Member** |
| 10. | **Smt. Nisha Wasnik** *(M.Com.)* | **Member** |
| 11. | **Smt. Parija Wasnik** *(M.Sc.)* | **Member** |

# इंदिरा गांधी कला, वाणिज्य महाविद्यालय
**कळमेश्वर, जि. नागपूर**

## महाविद्यालय विकास समिती

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. मधुकरराव वासनिक | - | अध्यक्ष |
| २. | ॲड. मोहन वासनिक | - | सदस्य |
| ३. | श्री. मनोज वासनिक | - | सदस्य |
| ४. | डॉ. हेमंत निमजे | - | सदस्य |
| ५. | श्री. धर्मेंद्र बनसोड | - | शैक्षणिक क्षेत्र |
| ६. | डॉ. राजेंद्र ढवळे | - | सामाजिक क्षेत्र |
| ७. | श्री. अमर जनबंधु | - | उद्योग क्षेत्र |
| ८. | डॉ. राजेंद्र कांबळे | - | प्राध्यापक प्रतिनिधी |
| ९. | डॉ. हेमंतकुमार बागडे | - | प्राध्यापक प्रतिनिधी |
| १०. | डॉ. मंजुषा ढोबळे | - | NAAC समन्वयक |
| ११. | प्रा. राजेश घोडेस्वार | - | प्राध्यापक प्रतिनिधी |
| १२. | श्री. के. ए. बागडे | - | शिक्षकेत्तर कर्मचारी |
| १३. | श्री. पंकज ठाकरे | - | माजी विद्यार्थी प्रतिनिधी |
| १४. | श्री. विकास बांबल | - | विद्यार्थी प्रतिनिधी |
| १५. | कु. दया केळवदे | - | विद्यार्थीनी प्रतिनिधी |
| १६. | डॉ. अजय चिकाटे | - | प्राचार्य/सचिव |

## शाळा समिती

१. डॉ. मधुकरराव वासनिक : अध्यक्ष
२. ॲड. मोहन एम. वासनिक : सदस्य
३. श्री. गणेश जोत : सदस्य
४. श्री. अश्वीन सरोदे : सदस्य
५. श्री. धर्मेंद्र बनसोड : सदस्य
६. डॉ. अजय चिकाटे : प्राचार्य/सचिव

## शैक्षणिक सत्र २०२३-२४ मधील विविध समिती

| अ.क्र. | समितीचे नाव | समिती प्रमुख |
|---|---|---|
| १ | प्रवेश समिती : | |
| | कला विभाग | डॉ. राजेंद्र कांबळे |
| | वाणिज्य विभाग | प्रा. राजेंद्र टेंभुर्णे |
| २ | वुमन सेल व महिला तक्रार निवारण समिती | डॉ. मंजुषा ढोबळे |
| ३ | ॲन्टी रॅगींग व विद्यार्थी तक्रार निवारण समिती | डॉ. राजेंद्र कांबळे |
| ४ | स्पर्धा परीक्षा व व्यवसाय मार्गदर्शन | प्रा. राजेश घोडेस्वार |
| ५ | माजी विद्यार्थी व पालक मेळावा समिती | डॉ. राजेंद्र कांबळे |
| ६ | सांस्कृतिक व वार्षिकोत्सव समिती | प्रा. राजेश घोडेस्वार |
| ७ | ग्रंथालय मार्गदर्शन समिती | डॉ. हेमंतकुमार बागडे |
| ८ | *IQAC* समन्वयक | डॉ. मंजुषा ढोबळे |
| ९ | नोडल अधिकारी *(MIS)* | डॉ. हेंमतकुमार बागडे |
| १० | राष्ट्रीय सेवा योजना विभाग | डॉ. राजेंद्र कांबळे |
| ११ | शैक्षणिक सहल समिती | प्रा. राजेश घोडेस्वार |
| १२ | समान संधी उपक्रम समिती | डॉ. मंजुषा ढोबळे |
| १३ | पर्यावरण शास्त्र - अध्यापन, प्रकल्प व परीक्षा | प्रा. राजेश घोडेस्वार |
| १४ | संशोधन आणि विस्तार समिती | डॉ. राजेंद्र कांबळे |
| १५ | क्रीडा समिती | डॉ. हेंमतकुमार बागडे |
| १६ | विद्यार्थी कल्याण व शिस्तपालन समिती | प्रा. राजेश घोडेस्वार |
| १७ | पारितोषिक वितरण समिती | प्रा. राजेश घोडेस्वार |
| १८ | वर्षिकांक समिती | डॉ. हेंमतकुमार बागडे |
| १९ | स्वच्छता व शैक्षणिक साधने, परिसर सौंदर्यीकरण | प्रा. गणेश जोत |

## १ आमच्या महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

- कला, वाणिज्य आणि किमान कौशल्यावर आधारित ज्ञानशाखांमधील कनिष्ठ आणि पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणाची सोय.
- वाणिज्य क्षेत्रांतील अनेक महत्त्वाचे अभ्यासक्रम.
- विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला आणि व्यक्तिमत्व विकासाला पोषक वातावरण.
- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कला व वाणिज्य अभ्यासक्रमांची सुविधा.
- समृद्ध ग्रंथालय, सुसज्जित संगणक लॅब, सुसंपन्न क्रीडा विभाग, भरगच्च सांस्कृतिक उपक्रम, अत्याधुनिक जीम.
- स्वयंशिस्त, सद्वर्तन आणि नैतिक संस्कारांना विशेष प्राधान्य.
- निसर्गरम्य आणि आल्हाददायक परिसर.
- नॅकद्वारा मूल्यांकनात ग्रामीण भागात उत्तम दर्जा.

## २ उद्दिष्टे आणि अपेक्षा

आमच्या महाविद्यालयाचे उद्दिष्ट मागासलेल्या भागातील व विशेषत: खेड्यापाड्यातील गरीब विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाचा प्रसार व प्रचार करून चारित्र्य संपन्न, सक्षम, आदर्श विद्यार्थी व नागरिक निर्माण करणे हे आहे.

**महाविद्यालयाची ध्येये :**

वरील उद्दिष्टांच्या पूर्तीकरिता महाविद्यालयाने खालील ध्येये निश्चित केली आहेत.

१) मानवी जीवनमूल्यांचा विद्यार्थ्यावर संस्कार करणे. (स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, मानवता इत्यादी.)

२) चारित्र्य संपन्न, शीलवान व शिस्तप्रिय विद्यार्थी निर्माण करणे.

३) मूलभूत कर्तव्ये पालन करणारा सक्षम नागरिक निर्माण करणे.

४) जीवनातील संकटांना धैर्याने तोंड देण्याची सिद्धता निर्माण करण्याकरिता युवकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोण, व्यावहारिक ज्ञान व आत्मविश्वासाचा विकास करणे.

५) सामाजिक बांधिलकीचा दृष्टिकोण निर्माण करणे.

६) व्यावसायिक विषयांचे शिक्षण देणे; जेणेकरून विद्यार्थी स्वावलंबी होऊ शकतील.

७) विभिन्न खेळ व क्रीडांचे प्रशिक्षण देऊन सुदृढ युवक निर्माण करणे.

८) विद्यार्थ्यांमधील सुप्त कला-गुणांचा विकास करणे.

९) निसर्गाचे रक्षण करण्याचा व पर्यावरणाचे संतुलन राखण्याचा दृष्टिकोण निर्माण करणे.

१०) व्यसनमुक्त युवक निर्माण करणे.

११) विद्यार्थ्यांना स्वयं रोजगाराकरिता प्रेरित करून सहकार्य करणे.

**विद्यार्थ्यांकडून अपेक्षा :**

या महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी वरील ध्येयांना नेहमी आपल्या डोळ्यांसमोर ठेवून एक आदर्श विद्यार्थी म्हणून जगण्याचा प्रयत्न करावा.

## ३ प्रवेश

- **फेर प्रवेश :** सामान्यत: कुठल्याही वर्गात फेरप्रवेश मिळणार नाही.
- **महाविद्यालयाकडून अर्ज रद्द होणे :** खालील कारणांमुळे अर्ज रद्द करण्यात येतील.

१. कार्यालयात अंतिम तिथीनंतर येणारे अर्ज.
२. अर्जात चुकीची माहिती आढळणे.
३. वडिलांची किंवा पालकांची खोटी सही करणे.
४. अर्जासोबत आवश्यक प्रमाणपत्रे न जोडणे.
५. अपूर्ण माहिती.
६. विद्यार्थ्याची वागणूक समाधानकारक नसणे.

- **विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द करणे :**

१. पालकांची सही असलेला लिखित अर्ज करून विद्यार्थी आपला प्रवेश रद्द करू शकतील.
२. वर्ष संपायच्याआधी केव्हाही प्रवेश रद्द केल्यास कुठलीही स्कॉलरशिप, फ्रीशिप किंवा सवलत मिळणार नाही. तसेच संपूर्ण वर्षाचे शुल्क द्यावे लागेल.

- **महाविद्यालयातून नाव काढून टाकणे (Rustication) :**

खालील कारणांस्तव कोणत्याही विद्यार्थ्याचे नाव महाविद्यालयातून काढून टाकण्याचा हक्क प्राचार्यांना आहे.

१. वर्तणूक असमाधानकारक असल्यास.
२. महाविद्यालयातील नियमांचे पालन न केल्यास.
३. विद्यापीठाने नोंदणीस *(Rustication)* अपात्र ठरविल्यास.
४. चुकीची माहिती व खोटे प्रमाणपत्र सादर केल्यास.
५. महाविद्यालयातील शुल्क ठराविक मुदतीत न भरल्यास.
६. आवश्यक तेवढी शैक्षणिक प्रगती नसल्यास.
७. प्रत्येक सत्रात व प्रत्येक विषयात ७५ टक्केपेक्षा कमी उपस्थिती असल्यास.
८. फौजदारी गुन्हा दाखल झाला असल्यास.

**सूचना :**

महाविद्यालयातून नाव काढून टाकल्यास पूर्ण वर्षाचे शुल्क द्यावे लागेल. अशा विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप, फ्रीशिप किंवा इतर कोणतीही सवलत मिळणार नाही.

## ४ उपस्थिती

१. विद्यापीठाच्या परीक्षेस बसण्यास पात्र होण्यासाठी विद्यार्थ्यांची उपस्थिती प्रत्येक सत्रात प्रत्येक विषयात किमान ७५ टक्के असायला हवी.
२. आजारी असल्यास वडिलांच्या सहीने व डॉक्टरांच्या प्रमाणापत्रासह वेळेवर अर्ज केल्यास व त्याबद्दल प्राचार्यांची खात्री पटल्यास १५ टक्केची अधिक सूट प्राचार्य देऊ शकतील. मात्र त्याबद्दल आधीच प्राचार्यांची परवानगी घेणे आवश्यक आहे.
३. प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्य दिनी विद्यार्थ्यांची उपस्थिती अनिवार्य आहे.

## ५ गणवेश (Uniform)

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांकरिता गणवेश अनिवार्य करण्यात आला आहे. गणवेश घालून न आल्यास प्रती दिवस ५ रु. प्रमाणे दंड आकारण्यात येईल. प्रवेश घेतल्यानंतर १५ दिवसांच्या आत गणवेश घालून येणे आवश्यक राहील. गणवेश खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे.

१. **मुलांकरिता :** नेव्ही ब्ल्यू फुलपँट, स्काय ब्ल्यू शर्ट, टॉय (नेव्ही ब्ल्यू)

२. **मुलींकरिता :** नेव्ही ब्ल्यू फुलपँट, स्काय ब्ल्यू शर्ट, टॉय (नेव्ही ब्ल्यू)

## ६ राष्ट्रीय सेवा योजना (Incenntive Marks 10)

महाविद्यालयात १०० विद्यार्थ्यांचे एक रा.से.यो. युनिट कार्यरत आहे. महाविद्यालयामार्फत शक्यतो डिसेंबर महिना किंवा इतर वेळी १० दिवसांचे श्रमसंस्कार शिबिर जवळपासच्या खेडेगावात आयोजित करण्यात येईल. अशा शिबिरात विविध प्रकल्प राबविले जातील.

१. प्रौढ शिक्षण, २. स्वच्छता व श्रमदान, ३. रस्ते दुरुस्ती, ४. सार्वजनिक आरोग्य सुधारणा, ५. ग्रामीण नागरिकांना प्रथामोपचाराची माहिती देणे, ६. ग्रामसुधारणेची विविध कार्ये, ७. मद्यनिषेध मोहीम राबविणे, ८. जनजागरण, ९. पर्यावरण, १०. वृक्षसंवर्धन व वृक्षारोपण, ११. महिला विकास व विविध सर्वेक्षण, १२. एड्ससंबंधी जनजागृती, १३. कृषीसंवर्धन, १४. जलसंवर्धन, १५. आपत्ती व्यवस्थापन.

## प्रौढशिक्षण (Incentive Marks 10)

महाविद्यालयात ५० विद्यार्थ्यांचे एक प्रौढ शिक्षण युनिट कार्यरत आहे. यात साक्षरता अभियान, लोकसंख्या शिक्षण इ. कार्यक्रमांचे वर्षभर आयोजन करण्यात येते. याशिवाय महिला अध्ययन सेवा केंद्र उपक्रमात ५० विद्यार्थिनींचा सहभाग असतो.

## सांस्कृतिक कार्यक्रम (Cultural Activities) (Incentive Marks 10)

महाविद्यालयीन, आंतरमहाविद्यालयीन व आंतरविद्यापीठीय विविध सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या व सर्व विजेत्यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर, विद्यापीठाच्या नियमानुसार इन्सेंटीव्ह मार्कस् दिले जातात.

## ७ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकचे अभ्यास केंद्र आहे. या केंद्रावर पूर्वतयारी व बी.ए./बी.कॉम.-प्रथम, द्वितीय व तृतीय वर्गांना प्रवेश दिल्या जातो.

## ८ विद्यार्थ्यांकरिता सर्वसाधारण नियम

१. महाविद्यालयाच्या परिसरात फक्त या महाविद्यालयात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेल. बाहेरच्या व माजी विद्यार्थ्यांना परवानगी घेतल्याशिवाय प्रवेश मिळणार नाही. कोणीही बाहेरचा विद्यार्थी/युवक महाविद्यालयाच्या परिसरात परवानगीशिवाय फिरताना आढळल्यास त्याला १०० रु. दंडासह त्याच्यावर अनुशासनात्मक कार्यवाही करण्यात येईल.

२. महाविद्यालयातील नियमित विद्यार्थ्यांजवळ महाविद्यालयाच्या प्राचार्यांची सही असलेले ओळखपत्र असणे आवश्यक आहे. अधिकृत ओळखपत्राशिवाय जर कुणी आढळल्यास त्याला २० रु. दंड आकारण्यात येईल.

३. वर्ग चालू असताना व्हरांड्यात उभे राहू नये, फिरू नये किंवा जोरात बोलून गोंधळ करू नये.

४. प्राचार्यांशी, प्राध्यापकांशी, कार्यालयातील कर्मचाऱ्यांशी आणि इतर विद्यार्थ्यांशीही सौजन्यपूर्वक वागावे, कुठलीही तक्रार असल्यास कार्यालयप्रमुखांकडे किंवा प्राचार्यांकडे करावी.

५. बाहेरील अतिथी आल्यास त्यांना अभिवादन करून स्वागत करावे व त्यांना सहकार्य करावे.

६. प्राचार्य किंवा प्राध्यापक आले असता उभे राहून त्यांचे स्वागत करावे. महाविद्यालयाच्या परिसरात किंवा परिसराबाहेर भेट झाली असता त्यांना अभिवादन करून योग्य सन्मान द्यावा.

७. महाविद्यालयात आयोजिलेल्या कार्यक्रमात व विविध स्पर्धांमध्ये स्वत: भाग घ्यावा व इतरांनाही भाग घेण्यास प्रोत्साहित करावे.

८. ग्रंथालयातील पुस्तकांची, क्रीडाविभागातील व संगणक व सामानाची काळजीपूर्वक हाताळणी करावी.

९. महाविद्यालयाची इमारत, वर्गातील फर्निचर, विद्युत उपकरणे, पंखे तसेच प्रयोगशाळेतील साहित्य यांचा योग्य वापर करून त्यांचे रक्षण करावे, मोडतोड करू नये.

१०. महाविद्यालयात सर्वत्र स्वच्छता ठेवावी. तसेच परिसरातील वृक्षांचे व फुलझाडांचे रक्षण करावे. जेणेकरून आपला महाविद्यालयीन परिसर सुंदर दिसेल.

११. महाविद्यालयाच्या परिसरात किंवा बाहेर कुठलेही व्यसन करू नये, ड्रग्ज, दारू, सिगारेट, बिडी, तंबाखू, सुपारी, पान, गुटखा इत्यादींवर महाविद्यालयात बंदी आहे. तसेच महाविद्यालयाच्या भिंतीवर थुंकू नये.

१२. महाविद्यालयात वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना सूचनाफलकावर लावण्यात येतील, विद्यार्थ्यांनी रोज सूचनाफलक पाहायची सवय करावी.

१३. विद्यार्थ्यांनी गृहकार्य वेळेवर पूर्ण करावे. तसेच सर्व परीक्षांमध्ये योग्य तयारी करून बसावे व परीक्षा प्रामाणिकपणे द्यावी.

१४. महाविद्यालयातून शिक्षण पूर्ण होऊन बाहेर पडल्यावरही महाविद्यालयाशी यथाशक्य संपर्क ठेवावा. तसेच महाविद्यालयाची प्रगती होईल अशा सूचना आणि यथाशक्ति सहकार्य करावे.

१५. महाविद्यालयासंबंधी औपचारिक/अनौपचारिक सूचना किंवा तक्रारींसाठी विद्यार्थ्यांनी सूचनापेटीचा उपयोग करावा.

१६. हे महाविद्यालय आपले सर्वांचे आहे. त्याचा गौरव वाढेल असे प्रयत्न करावेत.

१७. महाविद्यालयात 'रॅगिंग' प्रकार होऊ नयेत म्हणून रातुम नागपूर विद्यापीठ पत्र क्र. रातुमनावि/१०/वि.का. दि. ६ एप्रिल २०१० अन्वये पत्रानुसार संबंधित विद्यार्थ्यांवर कारवाई करण्यात येईल. असा प्रकार महाविद्यालयात होऊ नये म्हणून विद्यार्थ्यांनी दक्षता घ्यावी.

## पालकांसाठी सूचना

आपल्या पाल्यांचे भविष्य उज्ज्वल व्हावे ह्या उद्देशाने आपण त्यांचा या महाविद्यालयात प्रवेश करू इच्छित आहात. त्यांचा अभ्यास व दैनिक कार्यक्रम ह्या विषयात आपणास निश्चितच रुची आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या मौलिक कार्यात आम्हाला आपले सहकार्य लाभेल ही अपेक्षा आहे.

आम्ही अपेक्षा करतो की,

१. आपण महिन्यातून कमीत कमी एकदा तरी महाविद्यालयातील प्राध्यापकांना किंवा प्राचार्यांना भेटून आपल्या पाल्याचा अभ्यास, त्याची प्रगती, दैनिक उपस्थिती व त्याची वर्तणूक इत्यादींबाबत चौकशी करावी.

२. आपण शक्यतोवर सत्राच्या प्रारंभीच आपल्या पाल्यास पाठ्यपुस्तके व लेखन-सामग्री घेऊन द्यावी.

आम्हाला पूर्ण विश्वास आहे की, आपण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात अपेक्षित सहकार्य करून आमची गौरवशाली परंपरा अशीच पुढे चालू ठेवण्यास निश्चितच मदत कराल.

* * * * *

## महाविद्यालयात होणारे कार्यक्रम

महाविद्यालयात पुस्तकी शिक्षणाव्यतिरिक्त अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास घडविणे हा उद्देश असतो. सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत वादविवाद स्पर्धा, गीत गायन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा तसेच बौद्धिक चर्चासत्र यांचा यामध्ये समावेश आहे. तसेच मैदानी खेळांनाही प्राधान्य दिले जाते. विविध उपक्रमांच्याद्वारे महाराष्ट्र व देशातील मोठमोठ्या व्यक्तींचा परिचय विद्यार्थ्यांना घडवून दिला जातो. जुलै महिन्यात महाविद्यालयात वृक्षारोपण, रक्तदान शिबीर, स्वच्छता अभियान आयोजन करण्यात येते. ८ मार्च जागतिक महिला दिन, २५ जानेवारी राष्ट्रीय मतदार दिन, २१ जून आंतरराष्ट्रीय सद्भावना दिन सप्ताह, योग दिन, २६ नोव्हेंबर - संविधान दिन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर - महात्मा ज्योतीबा फुले व्याख्यानमाला.

**टिप :** १. शैक्षणिक सहल डिसेंबर च्या पहिल्या किंवा दुसरा आठवडा.

२. सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात.

या सर्व उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी रुची घेणे व सहभागी होणे आवश्यक आहे. विद्यार्थी बौद्धिक-मानसिक व शारीरिक दृष्टीने सक्षम व्हावा हा या उपक्रमांच्या मागील उद्देश आहे.

* * * * *

महाविद्यालयीन सत्र २०२३-२४

## ❖ वरिष्ठ महाविद्यालयीन माहिती पत्रक ❖

**१. अभ्यासक्रम :**

२०२३-२०२४ या शैक्षणिक सत्रात माहविद्यालयात (मराठी माध्यमातून) प्रथम वर्ष (सेमेस्टर १ व २) कला व वाणिज्य द्वितीय वर्ष (सेमेस्टर ३ व ४) कला व वाणिज्य, अंत्य वर्ष (सेमेस्टर ५ व ६) कला व वाणिज्य हे वर्ग राहतील. विद्यार्थ्यांना कोणत्याही वर्गात आवश्यक पात्रतेनुसार प्रवेशप्राप्त करता येईल.

### कला शाखा (Semester Pattern)

**२. अभ्यासक्रम विषय :**

**अ) प्रथम वर्ष कला (सत्र १ व २)**

१) अनिवार्य इंग्रजी
२) अनिवार्य मराठी
३) अर्थशास्त्र/इतिहास
४) राज्यशास्त्र/मराठी वाङ्मय
५) समाजशास्त्र/इंग्रजी वाङ्मय

**ब) द्वितीय वर्ष कला (सत्र ३ व ४)**

१) अनिवार्य इंग्रजी
२) अनिवार्य मराठी
३) अर्थशास्त्र/इतिहास
४) राज्यशास्त्र/मराठी वाङ्मय
५) समाजशास्त्र/इंग्रजी वाङ्मय
६) पर्यावरणशास्त्र

**क) अंत्य वर्ष कला (सत्र ५ व ६)**

१) अनिवार्य इंग्रजी
२) अनिवार्य मराठी
३) अर्थशास्त्र/इतिहास
४) राज्यशास्त्र/मराठी वाङ्मय
५) समाजशास्त्र/इंग्रजी वाङ्मय

### B.Com. I (Semester Pattern)

**Sem. I :**

1) *English*
2) *Marathi.*
3) *Fundamentals of Accounting*
4) *Commercial Firms*
5) *Business Skills*
6) *Business Economics - I*

**Sem. II :**

1) *English*
2) *Marathi*
3) *Statistics and Business Mathematics*
4) *Commercial Service*
5) *Skill Development*
6) *Business Economics - II*

### B.Com. II (Semester Pattern)

**Sem. III :**

1) *English*
2) *Marathi*
3) *Financial Accounting - I*
4) *Monetory Economics - I*
5) *Company Law*
6) *Holistic Development*

**Sem. IV :**

1) *English*
2) *Marathi*
3) *Financial Accounting - II*
4) *Monetory Economics - II*
5) *Organizational Behavior*
6) *Secretarial Practice*

**B.Com. III (Semester Pattern)**

**Sem. V :**

*1) Financial Accounting - IV* *2) Cost Accounting*

*3) Management Process* *4) Indian Economics*

**1) Elective Group I :**

*Marketing Management OR Computerized Accounting*

**2) Foundation Group I :**

*Business Finance - I OR Auditing*

**Sem. VI :**

*1) Financial Accounting - V* *2) Management Accounting*

*3) Advanced Statistics* *4) Indian Economics - II*

**1) Elective Group II :**

*Human Resource Management OR Income Tax*

**2) Foundation Group I :**

*Business Finance - II OR Industrial Law*

**टीप : रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या निर्देशानुसार विषयात काही बदल झाल्यास तो विद्यार्थ्यांना बंधनकारक राहील.**

* * * * *

## यु.जी.सी. द्वारा मान्यता प्राप्त व रा.तु.म. नागपूर विद्यापीठाद्वारा स्वीकृत बी.ए./बी.कॉम. द्वितीय वर्गाकरिता पर्यावरण अभ्यासक्रम (अनिवार्य)

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने सहा महिने अवधीचा पर्यावरण (अनिवार्य) अभ्यासक्रम शैक्षाणिक सत्र २००७-०८ पासून सर्व विद्याशाखांच्या स्नातक स्तरावर नोटीफिकेशन क्रमांक २ दिनांक २७ फेब्रुवारी २००७ द्वारा लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयामध्ये शैक्षणिक सत्र २००७-०८ पासून सुरू झालेल्या या अनिवार्य अभ्यासक्रमाचे उद्देश खालीलप्रमाणे :-

१) विद्यार्थ्यांमध्ये 'पर्यावरण सुरक्षा' या संबंधात जागृती निर्माण करणे.

२) नैसर्गिक साधने व त्यांचे महत्त्व, प्रदुषणाचे दुष्परिणाम, उपाय इत्यादी संबंधीत माहिती देणे.

३) सामाजिक प्रश्न व पर्यावरण यांची ओळख करून देणे.

४) मानवी लोकसंख्या व पर्यावरण यासंबंधात निगडित प्रश्नांची ओळख करून देणे.

**१. अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये :**

१) हा अभ्यासक्रम ६ महिने मुदतीचा राहील.

२) बी.ए./बी.कॉम. सत्र ३ व ४ मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना हा अभ्यासक्रम अनिवार्य राहील.

३) नियमित अभ्यासक्रमाव्यतिरिक्त या अभ्यासक्रमाचा अतिरिक्त कार्यभार एकूण ५० तासिका, प्रति सप्ताह ४ तासिका राहतील.

४) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मार्गदर्शक सूचना नुसार प्रति विद्यार्थी १००/– रुपये (शंभर रुपये केवळ) या अभ्यासक्रमाचे अतिरिक्त शुल्क आकारले जाईल. अंतिम शुल्क संरचना निर्धारित करण्याचा अधिकार विद्यापीठाच्या संबंधीत प्राधिकरणांचा राहील.

५) या अभ्यासक्रमाची परीक्षा महाविद्यालय स्वत: घेईल एकूण गुण १०० राहतील त्यांचे विभाजन खालीलप्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| *Field Note Book* | *25* |
| *Objective Questions* | *50* |
| *Essay Type Question (One)* | *25* |
| **Total Marks** | **100** |

**Passing Marks 40**

परीक्षेचा निकाल श्रेणीमध्ये खालीलप्रमाणे घोषित केला जाईल.

**Grade :** *0 : above 75, A : 61-75, B : 51-60, C : 40-50.*

६) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ द्वारा बी.ए./बी.कॉम. परीक्षेचे स्नातक प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरिता 'पर्यावरण अभ्यासक्रम' यशस्वीरित्या पास करणे आवश्यक राहील.

७) नापास होणे/अनुपस्थित राहणे या कारणांमुळे एखादा विद्यार्थी बी.ए./बी.कॉम. सत्र ३ व ४ मध्ये हा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करू शकला नाही तर त्याला अंतिम वर्षाला हा अभ्यासक्रम पास करावाच लागेल.

**२. अध्यापनाचे माध्यम :**

अध्यापनाचे माध्यम मराठी राहील.

**३. अध्यापनाची वेळ :**

वरिष्ठ महाविद्यालयाचे वर्ग सकाळी व कनिष्ठ महाविद्यालयाचे वर्ग दुपारी होतील.

**४. प्रवेश प्राप्त करण्याची पद्धती :**

महाविद्यालयाच्या कोणत्याही वर्गात प्रवेश घ्यावयाचा असल्यास माहिती पत्रकासोबत जोडलेला प्रवेश अर्ज स्वत:च्या हस्ताक्षरात पूर्णपणे भरून स्वत:च्या आणि वडिलांच्या किंवा पालकाच्या स्वाक्षरीने सादर करावा. प्रवेश अर्ज सादर करण्याची वेळ सकाळी १०.३० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत राहील.

**या प्रवेश अर्जासोबत खालील प्रमाणपत्र जोडावीत.**

१) महाविद्यालय/विद्यालय सोडल्याच्या प्रमाणपत्राची मूळ प्रत, २) गुणपत्रिकेची मूळप्रत आणि दोन प्रमाणित प्रत,३) शिधापत्रिकेची मूळ प्रत आणि एक प्रमाणित प्रत, ४) सद्वर्तनाबद्दलची दोन गृहस्थांकडून मिळवलेली दोन प्रमाणपत्रे, ५) नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश मिळविण्याकरिता आपल्या कार्यालयातील अधिकाऱ्याचे लेखी अनुमती पत्र,६) प्रवेशार्थिच्या छायाचित्राच्या दोन प्रती, ७) अंत्य वर्ष (सत्र ५ व ६) कला/वाणिज्य विद्यार्थ्यांना प्रथम वर्ष (सत्र १ व २) कला/वाणिज्य, द्वितीय वर्ष (सत्र ३ व ४) कला/वाणिज्य उत्तीर्ण केलेल्या परीक्षा गुणपत्रिकेच्या सत्य प्रतिलिपी जोडणे आवश्यक आहे.

**टीप :**१) वरील प्रमाणपत्राशिवाय प्रवेश अर्ज स्वीकारला जाणार नाही. २) महाविद्यालयात प्रवेश घेतांना विद्यालय अथवा महाविद्यालय बदलण्याचे दिलेले प्रमाणपत्र नंतर परत मिळणार नाही. ३) जे विद्यार्थी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक बोर्डाव्यतिरिक्त इतर परीक्षा उत्तीर्ण झालेले असतील त्यांनी स्थानांतर प्रमाणपत्र *(Migration Certificate)* दि. ३० सप्टेंबर २०१७ च्या आत सादर करावे. तसे न केल्यास विद्यापीठाकडून रु. २००.०० दंड केल्या जाईल व त्याचा प्रवेश अस्थायी स्वरुपाचा *(Provisional Admission)* समजला जाईल.

५. **प्रवेशासाठी आवश्यक पात्रता**

अ) प्रथम वर्ष/वाणिज्य (सत्र १ व २) वर्गाकरिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाची उच्च माध्यमिक शालांत *(H.S.C. Examination)* अथवा नागपूर विद्यापीठ तत्सम मान्य केलेल्या परीक्षा उत्तीर्ण असावा.

ब) द्वितीय वर्ष कला/वाणिज्य वर्गाकरिता प्रथम वर्ष कला/वाणिज्य परीक्षेत उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्याला प्रवेश दिला जाईल.

क) अंतिम वर्ष कला/वाणिज्य वर्गाकरिता द्वितीय वर्ष कला/वाणिज्य परीक्षेत उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्याला प्रवेश दिला जाईल.

ड) जे विद्यार्थी बाहेरील राज्यातील असतील त्यांना विद्यापीठाकडून 'पात्रता प्रमाणपत्र' प्राप्त करावे लागेल.

## ''प्रज्ञा स्पर्श''

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुप्त कला-गुणांना वाव देऊन त्यांना प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने विद्यार्थ्यांचे लेख, कविता, वर्षभरातील कार्यक्रम, उपक्रम याचा लेखा-जोखा ''**प्रज्ञास्पर्श**'' या वार्षिकांकातून प्रकाशित करण्यात येतो.

* * * * *

## Degree College B.A./B.Com

**(Granted Courses)**

*The following Fees are to be paid at the time of Admission*

**Scholarship and Freeship Students (Session 2023-2024)**

| No. | Particulars | B.A./B.Com. | | |
|---|---|---|---|---|
| | | Part I | Part II | Part III |
| 1. | College Text Exam. Fee | 200.00 | 200.00 | 200.00 |
| 2. | Identify Card Fee | 50.00 | 50.00 | 50.00 |
| 3. | Extra Cultural Activities Fee | 100.00 | 100.00 | 100.00 |
| 4. | Uni. Enrolment From Fee | 10.00 | .. | .. |
| 5. | Identification Card | 50.00 | 50.00 | 50.00 |
| 6. | Library B.T. Card | 40.00 | 40.00 | 40.00 |
| 7. | Students Insurance | 40.00 | 40.00 | 40.00 |
| | **Total** | **490.00** | **480.00** | **480.00** |

**टीप :** विद्यापीठाने निर्धारित केलेल्या शुल्कानुसार प्रवेश शुल्क आकारण्यात येईल.

## Degree College B.A./B.Com

**(Granted Courses)**

*The following Fees are to be paid at the time of Admission*

**Scholarship and Freeship Students (Session 2022-2023)**

| No. | Particulars | B.A./B.Com. | | |
|---|---|---|---|---|
| | | Part I | Part II | Part III |
| 1. | Tution Fee | 800.00 | 800.00 | 800.00 |
| 2. | Library Fee | 100.00 | 100.00 | 100.00 |
| 3. | Games-Sports Fee | 120.00 | 120.00 | 120.00 |
| 4. | Students Medical Aid Fee | 05.00 | 05.00 | 05.00 |
| 5. | Uni. Enrolment Form Fee | 10.00 | .. | .. |
| 6. | Uni. Enrolment Fee | 100.00 | .. | .. |
| 7. | Uni. Medical Form Fee | 05.00 | 05.00 | 05.00 |
| 8. | Uni. Annual Fee | 125.00 | 125.00 | 125.00 |
| 9. | Uni. Student Welfare Fund | 05.00 | 05.00 | 05.00 |
| 10. | Uni. Medical Exam Fee | 20.00 | 20.00 | 20.00 |
| 11. | Uni. Medical Aid Fee | 05.00 | 05.00 | 05.00 |
| 12. | Uni. Student Union Fee | 05.00 | 05.00 | 05.00 |
| 13. | Disaster Management Fee | 10.00 | 10.00 | 10.00 |
| 14. | Uni. Game Fee | 25.00 | 25.00 | 25.00 |
| 15. | Extra Cultural Activities Fee | 100.00 | 100.00 | 100.00 |
| 16. | Identity Card Fee | 50.00 | 50.00 | 50.00 |
| 17. | College Text Exam. Fee | 200.00 | 200.00 | 200.00 |
| 18. | Ashwamegh Sport Fee | 40.00 | 40.00 | 40.00 |
| 19. | E-Suvidha Fee | 50.00 | 50.00 | 50.00 |
| 20. | Uni. Development Fund | 10.00 | 10.00 | 10.00 |
| 21. | Uni. Environment Studies | .. | 100.00 | .. |
| 22. | Library B.T. Card Fee | 40.00 | 40.00 | 40.00 |
| 23. | Physical Efficiency Text | 25.00 | 25.00 | 25.00 |
| 24. | Identification Card | 50.00 | 50.00 | 50.00 |
| 25. | Students Insurance | 40.00 | 40.00 | 40.00 |
| | **Total** | **1940.00** | **1930.00** | **1830.00** |

**टीप :** विद्यापीठाने निर्धारित केलेल्या शुल्कानुसार प्रवेश शुल्क आकारण्यात येईल.

# कनिष्ठ महाविद्यालयीन प्रवेशाबद्दल माहिती

१. **अभ्यासक्रम :** २०२३-२०२४ ला अध्ययन सत्रात महाविद्यालयात (मराठी माध्यमातून) अकरावी कला व वाणिज्य, बारावी कला व वाणिज्य हे वर्ग राहतील. विद्यार्थ्यांना कोणत्याही वर्गात आवश्यक पात्रतेनुसार प्रवेश प्राप्त करता येईल.

२. **अभ्यास विषय :**

**कला शाखा (ARTS)**

| | | | |
|---|---|---|---|
| **(अ) अकरावी कला** | १) अनिवार्य इंग्रजी | २) अनिवार्य मराठी | ३) अर्थशास्त्र |
| | ४) इतिहास | ५) राज्यशास्त्र | ६) समाजशास्त्र |
| **(ब) बारावी कला** | १) अनिवार्य इंग्रजी | २) अनिवार्य मराठी | ३) अर्थशास्त्र |
| | ४) इतिहास | ५) राज्यशास्त्र | ६) समाजशास्त्र |

**वाणिज्य शाखा (COMMERCE)**

| | | | |
|---|---|---|---|
| **(अ) अकरावी वाणिज्य** | १) अनिवार्य इंग्रजी | २) अनिवार्य मराठी | ३) अर्थशास्त्र/सहकार |
| | ४) पुस्तपालन व लेखाकर्म | ५) व्यापार प्रबंधक | ६) सचिवीय कार्यपद्धती |
| **(ब) बारावी वाणिज्य** | १) अनिवार्य इंग्रजी | २) अनिवार्य मराठी | ३) अर्थशास्त्र/सहकार |
| | ४) पुस्तपालन व लेखाकर्म | ५) व्यापार प्रबंधक | ६) सचिवीय कार्यपद्धती |

**टीप :** ११ वी पास व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना १२ वी कला किंवा वाणिज्य शाखेत प्रवेश दिला जाणार नाही.

---

## किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम १० + २

**HSC Vocational (M.C.V.C.)**

१. **इलेक्ट्रीकल टेक्नॉलॉजी**

| | | |
|---|---|---|
| १) अनिवार्य इंग्रजी | २) मराठी | ३) जनरल फाऊंडेशन कोर्स *G.F.C.* |
| ४) इलेक्ट्रीकल वायरिंग | ५) इलेक्ट्रीकल अप्लायंसेस | ६) इलेक्ट्रीकल मशीन |

## JR College/H.S.C. Vocational (Session 2022-2023)

| No. | Particulars | 11th and 12th Arts and Commerce/MCVC Full Payee Student | | 11th and 12th Arts and Commerce/MCVC Scholarship Holder Student | |
|---|---|---|---|---|---|
| *1.* | *Admission Fee ..* | *18.00* | *20.00* | – | – |
| *3.* | *Session Fee ..* | *36.00* | *40.00* | – | – |
| *4.* | *Library Fee ..* | *50.00* | *50.00* | – | – |
| *5.* | *Identity Card Fee ..* | *50.00* | *50.00* | *50.00* | *50.00* |
| *6.* | *Identification Card ..* | *50.00* | *50.00* | *50.00* | *50.00* |
| *7.* | *Lib. B.T. Card ..* | *40.00* | *40.00* | *40.00* | *40.00* |
| | **Total** | **244.00** | **250.00** | **140.00** | **140.00** |

(**टिप :** *Junior College - T/F 192.00 - O/F - 140.00 - XI*
*T/F 216.00 - O/F - 145.00 - XII*
*MCVC - T/F 250.00 - O/F - 145.00 - XI*
*T/F 300.00 - O/F - 155.00 - XII*

# डॉ. अजय चिकाटे – प्राचार्य

## वरिष्ठ महाविद्यालय

### कला शाखा

१. **इंग्रजी विभाग**
- डॉ. श्रीमती एम. वाय. ढोबळे

२. **मराठी विभाग**
- प्रा. डॉ. एच. व्ही. बागडे

३. **राज्यशास्त्र विभाग**
- रिक्त

४. **अर्थशास्त्र विभाग**
- रिक्त

५. **समाजशास्त्र विभाग**
- प्रा. डॉ. आर. जे. कांबळे

६. **इतिहास विभाग**
- प्रा. आर. एच. घोडेस्वार

### वाणिज्य शाखा

- प्रा. राजेंद्र टेंभुर्णे

## कनिष्ठ महाविद्यालय

- श्री जी. डी. जोत
- कु. दीपा बिडकर (अर्धवेळ शिक्षिका)

## एच.एस.सी. व्होकेशनल

- श्री ए. एस. सरोदे

## शिक्षकेत्तर कर्मचारी

- श्री धर्मेंद्र बनसोड
- श्री. के. ए. बागडे



संपर्क : प्रा.राजेश घोडेस्वार, भ्रमणध्वनी क्र. ८८०६२५९४३९

# ACADEMIC CALENDAR 2023-24

| | | | |
|---|---|---|---|
| **A.** | **Admission Process** | | |
| | *a.* | *College reopens* | *16.06.2023* |
| | *b.* | *Admission start* | *16.06.2023* |
| | *c.* | *Last date of admission* | *07.08.2023* |
| | *d.* | *Teaching commences from* | *20.06.2023* |
| | *e.* | *Introductory meet of students and teachers (Welcome Program)* | *12.08.2023* |
| | *f.* | *Inauguration of Study Circles of various departments* | *Last week of September* |
| | | | *1. 1st Week of Nov. 2023 (Session One)* |
| | | | *2. 1st Week of April 2024 (Session Two)* |
| | *h.* | *Assignment, internal marks submitted* | *01.12.2023 (Session One), 05.05.2024 (Session Two)* |
| | *i.* | *National days celebrated* | |
| | | *1. Independence Day* | *15.08.2023* |
| | | *2. Sanvidhan Day* | *26.11.2023* |
| | | *3. Republic Day* | *26.01.2024* |
| **B.** | **Days Observed** | | **Programme shall be taken on** |
| | *1.* | *International Yoga Day* | *21.06.2023* |
| | *2.* | *World Population Day* | *11.07.2023* |
| | *3.* | *Tree Plantation* | *30.07.2023* |
| | *4.* | *Kranti Diwas (Quit India Movement Day)* | *09.08.2023* |
| | *5.* | *Teacher's Day* | *05.09.2023* |
| | *6.* | *International Literacy Day* | *08.09.2023* |
| | *7.* | *Parents Teacher's Meeting* | *By the end of September* |
| | *8.* | *Allumni meeting* | *By the end of September* |
| | *9.* | *N.S.S. Foundation Day* | *24.09.2023* |
| | *10.* | *Laxminarayan Day* | *30.09.2023* |
| | *11.* | *Mahatma Gandhi Jayanti* | *02.10.2023* |
| | *12.* | *Swayam Rojgar Margdarshan* | *Second week of November* |

| | | |
|---|---|---|
| *13.* | *World Aids Awareness Day* | *01.12.2023* |
| *14.* | *Dr. Ambedkar and Mahatma Phule Mahaparinirvana Day* | *06.12.2023* |
| *15.* | *Human Rights Day* | *10.12.2023* |
| *16.* | *Sant Gadge Maharaj Punyatithi* | *20.12.2023* |
| *17.* | *Savitribai Phule Jayanti* | *03.01.2024* |
| *18.* | *Swami Vivekanand & Rajmata Jijamata Jayanti* | *12.01.2024* |
| *19.* | *Marathi Bhasha Sanwardhan Pandharwada* | *14.01.2024-28.01.2024* |
| *20.* | *Ey Checkup Camp or Blood Donation or Sicke Cell Checkup Camp* | *22.01.2024* |
| *21.* | *National Voter's Day* | *25.01.2024* |
| *22.* | *College Annual Day Celebration* | *27.01.2024* |
| *23.* | *Chatrapati Shivaji Maharaj Jayanti* | *19.02.2024* |
| *24.* | *Marathi Vishva Bhasha Din* | *27.02.2024* |
| *25.* | *International Women's Day* | *08.03.2024* |
| *26.* | *Shahid Din & World Book Day* | *23.03.2024* |
| *27.* | *Dr. B. R. Ambedkar Jayanti* | *14.04.2024* |
| *28.* | *Rashtrasant Tukadoji Maharaj Jayanti* | *30.04.2024* |
| *29.* | *Educational Tour* | *1st Week of February 2024* |
| *30.* | *Medical Examination, Physical Examination* | *Last Week of February 2024* |
| *31.* | *N.S.S. Outdoor Camp (7 days)* | *1st Week of December 2023* |

## TERMS AND VACATIONS

| | |
|---|---|
| *First Term* | *16.06.2023 to 31.10.2023* |
| *Winter Vacation* | *01.11.2023 to 30.11.2023* |
| *Second Term* | *01.12.2023 to 30.04.2024* |
| *Summer Vacation* | *02.05.2024 to 15.06.2024* |

*****

# महाविद्यालयीन उपक्रम



माजी विद्यार्थी मेळावा



गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार




सांस्कृतिक कार्यक्रम




स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन




रक्तदान शिबीर



रक्तगट तपासणी शिबीर




प्रकाशक
**प्राचार्य डॉ. अजय चिकाटे**
भ्रमणभाष : ९८५०६९०७०४
इंदिरा गांधी कला-वाणिज्य महाविद्यालय
कळमेश्वर, जि. नागपूर
website : www.igacck.org / e-mail : igckcollege@gmail.com